नियमीत दिवाणी दावा क्र.४०८/२०१९

शरणम्मा वि. जयश्री

नि.क्र.६०

**वादीतर्फे सा.क्र.४ यांचा शपथेवर उलटतपास प्रतिवादी क्र.१ तर्फे विधीज्ञ श्री.ए.एम.डोंगरेः–**

माझे शिक्षण १२वी इयत्ते पर्यंत झालेले आहे. आम्हा भावंडामध्ये दोन बहिणी व तिघे भाऊ अशी भांवडे असून आमच्या थोरले ज्योतीर्लींग बंडप्पा देवर्शे, त्यानंतर जयश्री गंगाधर मठपती, रविशंकर बंडप्पा देवर्शे, चंद्रशेखर बंडप्पा देवर्शे, भाग्यश्री अंतेश्वर स्वामी. बंडप्पा हे प्राथमिक शाळेवर सह शिक्षक म्हणून कार्यरत होते. ते सन १९८६ साली सेवानिवृत्त झाले. बंडप्पा यांना सेवानिवृत्ती नंतर फंड व इतर नोकरीतील टप्प्याटप्प्यानंतर आले. माझी आई व शरणम्मा ही त्यावेळी शिक्षक म्हणून काम करत होती. शरणम्मा कोणत्या वर्षी नक्की ट्रेन झाल्या हे मला माहीत नाही. शरणम्मा कोणत्यावेळी मुख्याध्यापक झाल्या ही तारीख वार मी सांगू शकत नाही, त्या सन १९९० साली मुख्याध्यापक झाल्या. निवृत्तीनंतर वडिलांना ७–८ हजार पेन्शन मिळत होती. शरणम्मा हे बँकेमध्ये बचत खात्यावर किती पैसे भरायचे याचा रेकॉर्ड दाव्यात दाखल नाही. शरणम्मा सन २००३ साली सेवानिवृत्त झाल्या. शरणम्मांच्या स्त्रीधनाचा रेकॉर्ड या दाव्याच्या कामी आम्ही दाखल केलेला नाही.

<u>नियमीत दिवाणी दावा क्र.४०८/२०१९</u>

<u>शरणम्मा वि. जयश्री</u>

<u>नि.क्र.६०</u>

माझ्या वडिलांनी सन १९८६ साली निडेबन येथे शेती खरेदी केली, त्याची तारीख मी नक्की सांगू शकत नाही. खरेदीपत्र कोणत्या क्रमांकावर नोंदवले आहे हे मला सांगता येत नाही. ते खरेदीपत्र नॉमिलन होते असा मजकूर खरेदीपत्रात नव्हता किंवा कोणताही कागदोपत्री पुरावा मी दाखल करू शकत नाही. सन २०१० मध्ये साधारणतः माझे वय ४५ वर्षे होते. सन २०१० साली माझ्या आईने वडिलांकडून एक वाटणीपत्र करून घेतले, त्या वाटणीपत्रामध्ये मी व माझे भाऊबहिणी हे पार्टी नव्हते.

सन २०१५ मध्ये दि.दा.क्र.२४८/२०१५ हा दावा माझ्या आईने दाखल केलेला होता. तो तिने खरेदीचे पैसे दिले या करणावरून दिला होता. त्या दाव्याच्या कामी आम्ही भावंड त्यात पार्टी नव्हतो. दि.३०/१२/२०१५ रोजी माझे वडील मरण पावले. भाग्यश्री हिने वडिलांच्या मृत्यूपश्चात आम्हा सर्वांच्या नावे वारस प्रमाणपत्र मिळवले. भाग्यश्री हिने वारस प्रमाणपत्राच्या आधारे नोंद व्हावी म्हणून निडेबन येथे अर्ज दिला होता. तिच्या अर्जाच्या आधाराव फेरफेर क्र.१६५७ करण्यात आला व ५२ आर क्षेत्राला आम्हा सर्वांची वारस म्हणून नोंद करण्यात आली.हे म्हणणे खरे नाही की, सन २०१५ ला दावा निकाली झाला तरी त्याची नोंद महसूल दफ्तरी धरण्यात

आली नव्हती त्यामुळे वारस प्रमाणपत्राच्या आधारे सन २०१५ साली सर्व वारसांची नोंद झाली.

सन २०१७ साली मी वादीच्या विरुद्ध उदगीर न्यायालयात दावा दाखल केला. त्याचा दाव्याचा क्र.६७४/२०१७ असा होता. तो मालकी घोषीत करण्यासाठी व कायम मनाईसाठी दाखल केलेला दावा होता. हे म्हणणे खरे नाही की, त्या दाव्यामध्ये शरणम्माने मला अडथळा केल्याने कायम मनाई मिळण्यासाठी विनंती केलेली होती. मी तो दावा शरणम्मा यांच्याविरुद्ध दाखल केलेला होता. हे म्हणणे बरोबर आहे की, माझ्यात व शरणम्मात तडजोड झाली, तिने मला ४० आर जमीन देण्याचे मान्य व कबूल केले. चंद्रशेखरने शरणम्मा विरुद्ध दावा दाखल केला होता. त्यामध्ये सुध्दा मालकीच्या घोषणेसाठी व कायम मनाईसाठी विनंती केली होती. दि.१०/१०/२०२० ला शरणम्माने अडथळा केल्याचे नमूद करून दाव्याला कारण सादर केलेले होते. त्या दाव्यामध्ये पुढे तडजोड झाली. त्याद्वारे चंद्रशेखर याला शरणम्मा हिने जमीन दिली. हे म्हणणे खरे आहे की, सन २०१७ पासून व सन २०१९ पूर्वीपासून दावा मिळकतीवर माझा व चंद्रशेखर यांचा कब्जा होता त्यामुळे वादाचा प्रश्न उद्भवला नाही. हे म्हणणे खरे नाही की, दि.२२/०६/२०१९ ला दाव्याचे कारण घडले नाही. वादींचे जे दावे मंजूर झाले त्याविरुद्ध प्रतिवादींनी

<u>नियमीत दिवाणी दावा क्र.४०८/२०१९</u>

<u>शरणम्मा वि. जयश्री</u>

<u>नि.क्र.६०</u>

उच्च न्यायालय येथे अपिल केल्याचे माझ्या माहितीत नाही. उपविभागीय अधिकारी यांच्या आदेशाविरुद्ध प्रतिवादी क्र.१ व २ यांनी कलेक्टर साहेब यांच्याकडे अपिल केल्याचे माझ्या माहितीत नाही. हे म्हणणे खरे आहे की, वादी मिळकतीमध्ये शरणम्मा हिच्या नावाने काहीच जमीन शिल्लक नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादी हिला हाताशी धरून आम्ही सबळ जमीनी स्वतःच्या नावे करून घेतल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी क्र.१ व २ यांना हिस्सा आहे. आम्ही वारस प्रमाणपत्राविरुद्ध आजपर्यंत कोणीही अपिल केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, आईच्या सांगण्यावरून मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास संपला.

पुनःतपास नाही.

**श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत**

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by VIJAY RAMCHANDRA GHARAL
Date: 2025.07.16 14:53:56 +0530

**( श्री. व्ही. आर. घराळ )**

**सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,**

**उदगीर.**

**ठिकाणः उदगीर**

**दिनांकः– १६/०७/२०२५**